GLOBAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही
मराठी माणसाचे स्वतःचे वृत्तपत्र.

# मराठी साहित्यिक, कलावंतांचे दालन शिवसेना उभारणार

## उद्धव ठाकरे यांची ग्वाही

मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी) – मराठी माणसांचे आयुष्य आनंदमयी करणाऱ्या पु. ल. देशपांडे यांच्या साहित्य खजिन्याचे कायमस्वरूपी दालन होण्याची गरज आहे. पुलंबरोबरच मराठी मातीतील सर्व साहित्यिक व कलावंतांचे साहित्य दालन मुंबई महापालिकेच्या वतीने उभारण्यासाठी शिवसेना सर्वतोपरी प्रयत्न करील अशी ग्वाही शिवसेना कार्यप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली.

गोरेगावच्या प्रबोधन क्रीडा भवन येथे गेले तीन दिवस सुरू असलेल्या पुलोत्सवाचा सांगता सोहळा उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी ते म्हणाले, पुलंचे सर्व कलागुण एकत्रितपणे साठवायला हवेत. त्यासाठी आम्ही प्रयत्न करू. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शिवतीर्थावर संयुक्त महाराष्ट्राचे दालन महापालिकेने उभारले. तसेच मराठी कलाकार, नाटककार, शिल्पकार, मूर्तिकार, साहित्यिकांचा ठेवा जपणारे मराठी साहित्य दालन उभारण्यात येईल. पान ८

### शिवसेनाप्रमुख आणि पु. ल.

*शिवसेनाप्रमुख आणि पु. ल. देशपांडे यांची खास दोस्ती होती असे सांगून उद्धव ठाकरे म्हणाले, प्रवासातही शिवसेनाप्रमुख पुलंची भाषणे, साहित्य व संगीत ऐकत असत. जेव्हा भेट होई तेव्हा*

### अंगावर येणाऱ्याला मराठी माणूस शिंगावर घेतो

*पुल आणि मराठी माणूस असा विषय निघताच उद्धव ठाकरे म्हणाले, मराठी माणूस आपणहून कोणाच्या वाटेला जात नाही, पण कोणी अंगावर आलाच तर त्याला*

GLOBAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही
मराठी माणसाचे
स्वतःचे वृत्तपत्र.

# मराठी साहित्यिक, कलावंतांचे दालन शिवसेना उभारणार



पु. ल. उत्सवातील प्रदर्शन पाहताना शिवसेना कार्यप्रमुख उद्धव ठाकरे. सोबत शिवसेना विधिमंडळ पक्षनेते व प्रबोधनचे संस्थापक सुभाष देसाई

*(पान १ वरून)* पु. ल. देशपांडे म्हणजे अथांग पसरलेल्या समुद्रासारखे व्यक्तिमत्त्व. या सागरातून प्रत्येकाला काही ना काही मिळाले. मराठी माणसाचे जीवन पुलंच्या साहित्याने समृद्ध केले, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## 'पुलश्री' गौरव अंक वेबसाइटवर

पुलोत्सवाच्या निमित्ताने 'पुलश्री' गौरव अंक काढण्यात आला असून तो संजय पेठे यांनी बुकगंगा डॉट कॉम या वेबसाइटवर उपलब्ध करून दिला आहे. उद्धव ठाकरे यांच्या हस्ते क्लीक करून या वेबसाइटवर 'पुलश्री' अंक टाकण्यात आला.

## प्रबोधनचे कौतुक

प्रबोधन संस्थेने तीन दिवस पुलोत्सव आयोजित करून एक आगळेवेगळे काम केले आहे. पुलंचे सर्व साहित्य एकत्र आणणे हे येरागबाळ्याचे काम नव्हे. पण केवळ शिवसैनिकच हे काम करू शकतात, असे गौरवोद्‌गार उद्धव ठाकरें यांनी काढले. यावेळी प्रबोधनचे संस्थापक व शिवसेना विधिमंडळ पक्षनेते सुभाष देसाई तसेच प्रबोधनचे अध्यक्ष मनोहर अद्‌वानकर यांचा उद्धव ठाकरे यांनी पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. यावेळी पालिकेचे सभागृहनेते सुनील प्रभू उपस्थित होते.